प्रेसनोट

जा.क्र.  /जनसंपर्क कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २५/०७/२०१८

# गोधनाची अवैध वाहतुक करणारा ट्रक पकडला, ३ अटकेत
## भंडारा जिल्हा पोलीसांची कार्यवाही

**पोलीस ठाणे साकोली** : — दिनांक २५/०७/२०१८ रोजी पोलीस अधीक्षक भंडारा विनीता साहू व अपर पोलीस अधीक्षक रश्मी नांदेडकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस स्टेशन साकोलीचे ठाणेदार व सहकारी कर्मचा—यांनी वेळीच सर्तकता दाखवुन शिताफिने राष्ट्रीय महामार्ग क्र. ६ रोडवर शेंदरवाफा कडुन भंडारा कडे जाणारा ट्रक क्र. एम.एच.३५/के ५१८६ मध्ये अवैधरित्या जनावरांना कोंबुन क्रूरतेने वागवुन वाहतुक करणारा ट्रक पकडला.

सदर ट्रकमध्ये ३९ जनावरे होती ज्यात ३५ गाई, ४ गोरे किमंती ३,१२,०००/—रू व ट्रक किंमती १५,५०,०००/ रू, असा एकुण किमंती १८,६२,०००/— रू मिळुन आल्याने आरोपींतान विरूध्द पोलीस ठाणे साकोली येथे कलम ११(१)(घ)(ड) प्राण्यांना निर्दयतेने वागविण्याचा कायदा सहकलम ११९ महाराष्ट्र पोलीस अधिनियम सहकलम ८३/१७७ मोवाका अन्वये गुन्हा नोंद केला असुन सर्व गोधन लाखनी येथील गोशाळेत ठेवण्यात आले आहेत. सदर गुन्हयात आरोपी क्र १. शादिक छोटेसाहब शेख, वय २६ वर्ष, क्र. २. फिरोज नईम खॉ पठाण, वय ३८ वर्ष दोन्ही रा. सडक अर्जुनी जिल्हा गोंदिया, क्र. ३. किशोर माधवराव झाडे, वय ३९ वर्ष रा. केसलवाडा जिल्हा गोंदिया यांना अटक करण्यात आले आहे गुन्हयाचा तपास स.फौ. पाटील,ब.नं. ११० पोलीस स्टेशन साकोली करीत आहेत.

(जितेद्रं के आडोळे)
पोलीस उपनिरीक्षक
जनसंपर्क अधिकारी
संपर्क क्र. ९४०३१०९७२०

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.